सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
## मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in, E-Mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११५६३

क्रमांक-ममअ-ब/२०१४/परि/प्रशा-१ दिनांक-१/१/२०१५

**अत्यंत महत्वाचे**

**विषय- सहसंचालकस्तरावर करावयाच्या कार्यवाही करणे बाबत.**

उपरोक्त विषया बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्या बाबत कळविण्यात येत आहेत.

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या दिनांक १५/९/२०१४ च्या पत्रानुसार सर्व शासकीय कार्यालये तसेच सर्व विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह आहेत किंवा कसे यांची खात्री करण्यात यावी. नसल्यास त्याठिकाणी अशा सुविधा करण्यात याव्यात. स्वच्छतागृहे बांधण्या बाबत संबंधीतांस कळविण्यात यावे, स्वच्छताराखण्यासाठी आऊटसोर्सींग करता येईल का ? या संदर्भात दिनांक १८/९/२०१४ चे पत्र, राष्ट्रीय महिला आयोगाचे Installation of a sanitary napkin,vending machine in all educational Institution बाबत दिनांक ३/९/२०१४ चे पत्राचे अवलोकन करावे.

२. न्यायमुर्ती धर्माधिकारी समितीचा ५ व्या अहवालानुसार जनहित याचिका क्र. २०/१२ अन्वये सर्व शैक्षणिक संस्था कार्यालये यामध्ये विद्यार्थीनींना व महिला कर्मचारी छेडछाड प्रतिबंध करण्यासाठी विशाखा जजमेंटनुसार महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे, अशासकीय सदस्य आवश्यक आहे. तसेच समितीमध्ये महिला अध्यक्ष असणे आवश्यक आहे. समितीमधील ५० टक्के सदस्य महिला असणे आवश्यक आहे. कार्यालयामध्ये समितीचा फलक व त्यावर नजीकच्या पोलीसस्टेशनचा दुरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. या बाबत संचालनालयाच्या दिनांक १०/१०/२०१४ चे पत्र पहावे.

३. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी विभागीय पातळीवर दक्षता निर्मुलन समिती व त्याची बैठक दर तीन महिन्यातून घेणे आवश्यक आहे. या बाबत सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अहत/१६१०/प्र.क्र.६४/१०/११ अ दिनांक ४/२/२०११ नुसार कार्यवाही करणे. इतिवृत्त ठेवणे.

४. अपंग कोटा भरणे/अपंगांना मागणीनुसार उपकरणे पुरविणे

५. ॲन्टी रॅगींग समिती/ॲन्टी रॅगींग स्कॉड स्थापन करणे. क्ष्याची कर्तव्य कोणती आहेत, दरमहा बैठक घ्यावी.इतिवृत्त ठेवावे.

६. नॅक मुल्यांकन/पूर्वमुल्यांकन करण्यास ज्या महाविद्यालयांनी विलंब केला आहे त्यांना मुदत देवून नॅक करण्यास भाग पाडणे.

७. सर्व विभागीय सहसंचालक उच्चशिक्षण यांना महात्मा गांधी यांच्या जन्मदिवस २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान सुरु करण्या बाबत व वर्षभर राबविणे बाबत संचालनालयाने दिनांक ३०/९/२०१४ अन्वये पत्र दिलेले आहे त्यानुसार कार्यवाही करावी. सहा बंडल दप्तर लावणे.

८. तारांकित प्रश्न, १९ महाविद्यालयांना फायर ऑडीट सक्तीचे असुन संबधीत महाविद्यालयांनी या बाबतची माहिती कळवावी (दरवर्षी फायर ऑडिट करणे) प्रशिक्षण देणे.

९. तंबाखू नियंत्रण कायदा 2003
नियम व बाबत शासनपत्र
सांकिर्ण-१४१४/प्र.क्र./१४१/विशी-3
दि ३०/१२/१४ सर्व शैक्षणिक
संस्थांना देणे.

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक(उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

1/1/2015

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक उच्चशिक्षण